**नि.दि.दा.क्र. ६१/२०१७**

**नि. ८३ लगत**

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे ॲड एस.जी.मुलाणी यांच्यातर्फे शपथेवर सुरु .</u>**

माझे १२ वी चे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी पशुधन पर्यवेक्षक आहे. मी खाजगी व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की मी कोरेगाव येथे राहतो. पशुधन पर्यवेक्षक म्हणून काम करणेकरीता मी त्याचा कोर्स केला आहे व माझ्याकडे महात्मा फुले कृषी विदयापीठचे प्रमाणपत्र आहे. मला अत्यावश्यकता असल्यास जिल्हाभर जावे लागते. सदर काम मी सन १९९० पासून करत आहे. सदर कोर्स सन १९८९–१९९० मध्ये पूर्ण झाला. मी सदर काम अनभुलेवाडी येथे सुरु केले होते. मी साधारण २० वर्षांपासून कोरेगाव येथे राहतो. मी प्रस्तुतचा दावा अग्रहक्काच्या व वाटपाच्या मागणीकरीता दाखल केला आहे. या व्यतिरिक्त असलेली मागणी मला सांगता येणार नाही. मी मुरलीधर गोविंद अनभुले याचा अग्रहक्क मागत आहे. हे म्हणणे खरे आहे की मुरलीधर अनभुले यांना मुलं व मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी मुरलीधर अनभुले यांच्या प्रथम वर्गातील वारस नाही. हे म्हणणे खरे आहे की मी सरतपासात १क –१ ते १क –१० अशी घरांची वर्णने दिलेली आहेत. सदर घरे कोणाच्या मालकीची आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर घरे अनभुलेवाडी, ता. कोरेगाव येथील आहेत. सदर घरात गोरखनाथ विष्णू अनभुले, रामदास विष्णू अनभुले, आदिनाथ विष्णू अनभुले, विनायक विष्णू अनभुले, तुकाराम काशिनाथ अनभुले, चंद्रकांत काशिनाथ अनभुले, हिंदुराव काशिनाथ अनभुले, कर्णदास काशिनाथ अनभुले, मुरलीधर गोविंद अनभुले, लिलाबाई दत्तु अनभुले, मुक्ताबाई दत्तु अनभुले राहतात. हे म्हणणे खरे आहे की हे सर्व लोक त्यांच्या कुटुंबासह त्या घरात राहतात. सदर घरे विखुरलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. ४ यांचा रहिवास रानात आहे. हे म्हणणे खरे नाही की ती घरे ४५ ते ५० वर्षापूर्वीची आहेत. हे म्हणणे खरे आहे की मुरलीधर अनभुले याचे घर ४५ ते ५० वर्षापूर्वीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की वंशावळीत दिलेले सर्वजण याच १० घरात राहतात. साक्षीदार स्वतःहून सांगतो की काही लोक नोकरी निमित्त बाहेरगावी राहतात. आमचा जुना वाडा अनभुलेवाडी या गावात होता. हे म्हणणे खरे आहे की तो वाडा पडीक अवस्थेत आहे. हे म्हणणे खरे आहे की तो वाडा ३० वर्षांपासून पडीक आहे.

हे म्हणणे खरे आहे की सदर १० घरात लोक ४० वर्षांपासून राहतात. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात कलम १क–१ ते १क–१० मध्ये कोण राहते हे मी मुद्दामहून नमुद केले नाही. मी दावा दाखल करण्यापूर्वी दाव्यातील जमीन मिळकतीचे ७/१२ उतारे काढून पाहिले होते व फेरफार जेवढे मिळाले तेवढे काढून पाहिले होते. मी दिनांक २५/०४/१९७८ रोजीचा फेरफार क्र. ९३० पाहिला होता व त्यानुसार माझे वडील व तीन चुलते यांची प्रत्येकी चार आणे हिस्स्यास नोंद झाल्याचे मी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांचे पूर्ण नाव विष्णू गोविंद अनभुले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी दिनांक ११/११/१९९२ रोजी अर्ज दिला होता व त्याप्रमाणे फेरफार नं. ३५ होवून वादी क्र. १ ते ४ यांच्या नावाची नोंद झाली. कौटुंबीक व्यवस्था म्हणजे सोयीप्रमाणे वहिवाटत होतो. कौटुंबीक व्यवस्थेनुसार संपूर्ण जमीनीत सर्व अनभुले कुटुंबीयांच्या वहिवाटी आहेत.

**प्रतिवादी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत

कोरेगाव **(ए. ए. पाचरणे)**

दि. २८/०३/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.